# इतिवृत्त

पंचगंगा नदी प्रदूषण संबंधी प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर येथे दि. १५.६.२०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजता बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालिल प्रमाणे उपस्थिती होते.

१. श्री. प्र. म. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर.

२. श्री. अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर.

३. श्री. सी. एम. कागलकर, जल अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.

४. श्री. एन. बी. भोई, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

५. श्री. उदय गायकवाड, विज्ञान प्रबोधिनी, कोल्हापूर.

६. ॲड. केदार मुनीश्वर, कोल्हापूर.

७. ॲड. गुरुप्रसाद माळकर, कोल्हापूर.

यावेळी खालिलप्रमाणे चर्चा झाली.

सर्वप्रथम श्री. प्र. म. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच कोल्हापूर महानगरपालिका म.प्र.नि. मंडळाने दिलेल्या पत्राला उत्तर देत नाही याबाबत नाराजी व्यक्त केली.

यावेळी श्री. दुर्गुळे यांनी सांगितले की, पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत विविध तक्रारी वारंवार या कार्यालयास प्राप्त होत आहेत त्यावर कोल्हापूर महानगरपालिकेने ठोस पावले उचललेली नसून संबंधित उपाययोजना कालमर्यादेत पूर्ण न झाल्याचे निदर्शनास येतात. याबाबत आजच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे ज्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येणा-या ठोस उपाययोजनाची चर्चा करण्यात येणार आहे.

यावेळी श्री. उदय गायकवाड, विज्ञान प्रबोधिनी यांनी सांगितले पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न हा १९९० पासून चालू आहे व त्याचा आढावा घेवून त्यांनी पुढील मुददे मांडले.

१. किमान २ महिन्यातून एकदा सुकाणू समितीची मिटींग ठेवण्यात यावी.

२. तसचे पंचगंगा नदी प्रदूषण थांबवण्यासाठी शॉर्ट टर्म व लाँग टर्म उपाय योजनांची चर्चा करण्यात यावी.

त्यावर कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी सदरील मुद्याबाबत सांगताना २००७ साली सांडपाणी प्रक्रियेसाठी १३४ कोटी रुपयाची स्कीम तयार करण्यात आलेली होती ज्यामध्ये जयंती व दुधाळी या मुख्य नाल्यांवर प्रक्रिया सयंत्रणा बसवण्याचे प्रयोजन होते. कोल्हापूर शहरासाठी शिंगणापूर येथून ११० एमएलडी पाण्याचा पुरवठा होतो परंतु फक्त ७२ एमएलडी सांडपाण्याची निर्मीती होते कारण पाणी पुरवठया दरम्यान अंदाजे २० टक्के पाणी हे वाया जाते. त्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेकडे कसबा बावडा येथे ४३.५ एमएलडी क्षमतेचा प्लँट हा १९७४ साली बांधण्यात आलेला आहे. सदरील प्लँट हा पुढे ८ वर्ष व्यवस्थित चालला परंतु तदनंतर त्याची योग्य ती देखभाल न झाल्याने सद्यस्थितीत तो व्यवस्थीत चालत नाही. यावर श्री. उदय गायकवाड यांनी बोअरवेल्स, विहिरी, खाजगी विहिरी यांच्या पाण्याचा समावेश करण्यात आलेला दिसत नसल्याचे तसेच शहराच्या आजूबाजूला कळंबा, पाचगाव इ. ग्रामपंचायतीचे सांडपाणी कोल्हापूर शहरातील नाल्यात येते असे सांगितले. यावर कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी कोल्हापूर महानगरपालिकेच्या हददीत ७०० बोअर आहेत त्या पैकी ४७ इलेक्ट्रीक मोटर्स व्दारा चालू करण्यात येतात व बाकीच्या बोअरवेलवर हातपंप वापरण्यात येत आहेत. तसेच शहरातील १४ विहिरींवर पंप बसविलेले आहेत या सर्वांचा एकंदरीत विचार करता एकूण ३ ते ३.५ एमएलडी पाण्याचा उपसा केला जातो. तसेच कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या मोफत पाण्याच्या चाव्यांचे जवळपास २६०० कनेक्शन काढली आहेत व ४५० कनेक्शन अधिकृत करुन संबंधितांना देण्यात आलेली आहेत. त्यामुळे ७ ते ८ एलएलडी पाणी वाचते असे निदर्शनास आणले. या सर्वांचा एकंदरीत विचार करता कोल्हापूर शहरातून ८० एलएलडी इतके घरगुती सांडपाणी २०१० साली जनरेट होईल या दृष्टीने ७६ एमएलडी चे काम सुरु करण्यात आलेले आहे व ते पुढील १५ महिन्यांत पूर्ण होईल असे आश्वासन दिले. सदरील प्रकल्पासाठी लागणा-या खर्चापैकी ७० टक्केखर्च हा केंद्र शासनामार्फत अनुदान स्वरुपात देण्यात येणार असून उर्वरित ३० टक्के खर्च हा कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे. सदरील सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा ही बी.ओ.ओ.टी. तत्वावर पूर्ण करण्यात येणार असून सदरील प्रकल्प हा ज्या काँट्रॅक्टरला

बांधण्यास देण्यात आलेला आहे त्यांनी पुढील १५ वर्षे त्याचा मेंटेनंस करावयाचा आहे. तसेच दुधाळी नाल्यावरती २६ एलएलडी क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्याचे प्रयोजन आहे त्यासाठी निवडलेली जागा ही सखल भागात असल्यामुळे तेथे १२ मिटर उंचीचा प्लॅटफॉर्म करणे गरजेचे आहे त्यामुळे सदरील दुधाळी नाल्यातील सांडपाणी पूर्णपणे जयंती नाल्याकडे पाठवणे सोईचे होते किंवा कसे याबाबत विचार करणे गरजेचे आहे. त्यावर श्री. उदय गायकवाड यांनी दुधाळी येथील सांडपाणी पंप करुन जयंती नाला येथून बावडयाकडे घेतल्यास दररोज विजेचा खर्च होईल तसेच पाईपलाईन ब्रेकेज झाल्यास परत दुधाळी नाल्यातील पाणी पंचगंगा नदीत मिसळेल त्यामुळे विकेंद्रीकरण पध्दती नुसार दुधाळी नाल्यावर वेगळी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा होणे गरजेचे आहे.

यावेळी श्री. जोशी, प्रादेशिक अधिकारी यांनी ७६ एमएलडी ऐवढे अंडर ग्राऊंडचे काम होणार का असे विचारले व कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी होय सर्व सांडपाणी जाणार नाला मोकळा होणार असे लाँग टर्म मेजर आहेत त्याला २ वर्षे लागतील असे सांगितले. तसेच शॉर्ट टर्मसाठी १२ नाल्यावर १५ ते २० लाख रुपये खर्च करायला आज आमच्याकडे पैसे नाहीत ड्रेनेज स्कीम डिसेंबर पर्यंत पूर्ण करणार आता सांडपाण्याचा बी.ओ.डी. १०० ते १४० आहे. (४० ते ५० आला तर २.५ किमी जाई पर्यंत २५ ते ३० पर्यंत जाईल) शॉर्ट टर्म मेजर म्हणून जयंती नाल्यावर मोठा बंधारा चालू केला आहे तो पूर्ण होण्यास ४ महिने लागणार असून त्यावर २ कोटी खर्च करणार असल्यामुळे सध्या असणारे स्टोरेज वाढणार आहे त्यामुळे सध्या शॉर्ट टर्मसाठी काहीही करता येणार नाही कारण १५ ते १६ महिने शॉर्ट टर्म काहीही करु शकणार नाही असे सांगितले.

यावेळी श्री. उदय गायकवाड यांनी जयंती नाल्यातील फलोटींग काढणे गरजेचे असून किमान ओव्हर फलो होवू नये याची काळजी कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत घ्यावी असे सांगितले. यावेळी कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी आमची क्षमता १२० एमएलडी उचल करण्याची आहे व त्यासाठी एक्सप्रेस फिडर आहे. तसेच दुसरा जनरेटर येणार आहे. बुधवार पेठ नाला दुधाळी नाल्यामध्ये घेणार. यावेळी श्री उदय गायकवाड यांनी जयंती नाला

डाउन स्ट्रीम कच्चा बंधारा घालून नदीच्या २०० मिटर अगोदर अडवता येईल असे सांगितले. बुधवार पेठ, सीपीआर, रमणमळा दुधाळी, यांच्या सर्वेक्षणाला दिड महिने द्या असे कोल्हापूर महानगरपालिकेने सांगितले. यावेळी श्री. उदय गायकवाड यांनी सप्टेंबर अगोदर डिझाईन एस्टिमेट करुन मंजूरी सरकारकडून घ्या असे सांगितले.

पिकनिक स्पॉट - हा नाला मुख्य नाल्याला जोडणार आहे त्यासाठी ४ लाखाचे एस्टीमेट आहे. डिसेंबर जानेवारी पर्यंत काम करणार असे कोल्हापूर महानगरपालिकेच्या अधिका-यांनी सांगितले. यावेळी श्री. जोशी यांनी इतर ठिकाणचे सुध्दा सर्वेक्षण करुन घ्या असे सांगितले.

जयंती नाल्यासाठी मंडळाने सहकार्य करावे असे सांगितले त्यावेळी श्री. जोशी यांनी नाही म्हणून सांगितले. लातूरला १ कोटी दिले त्याचा उपयोग झाला नाही.

यावेळी श्री उदय गायकवाड यांनी कळंबा, पाचगाव, मोरेवाडी इ. ग्रामपंचायतीचे सांडपाणी येते त्याची जबाबदारी त्यांनी घ्यावी असे सांगितले. श्री. जोशी यांनी त्यातून घनकचरा सुध्दा येवू शकतो असे सांगितले. यावेळी कोल्हापूर महानगरपालिकेने सर्व ग्रामपंचातीचे १२ एमएलडी पाणी मिसळते असे सांगितले.

यावेळी श्री उदय गायकवाड यांनी कोल्हापूर जिल्हयातील १७४ गावे नदीवर आहेत नदी काठावरची ३४४ गावे कोल्हापूर पेरीफरीतील आहे त्यांचे १० ते १५ एमएलडी सांडपाणी नदीत मिसळते त्यावर काय उपाय योजना करणार याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने सांगावा असे सांगितले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या प्रतिनिधींनी ३ जानेवारी २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे पाठवणार असे सांगितले. यावेळी श्री. जोशी यांनी शासन निर्णयाची प्रत मंडळाला द्यावी असे सांगितले.

यावेळी श्री. उदय गायकवाड यांनी मप्रनि मंडळाने याबाबत कारवाई करावी व आदेश द्यावेत तसेच १३५ गावांचे प्रस्ताव ताबडतोब तयार करावे अशा सूचना द्याव्या असे सांगितले. यावेळी श्री. जोशी यांनी जिल्हापरिषदेला वरील प्रमाणे सूचना दिल्या.

यावेळी श्री. उदय गायकवाड यांनी वरील ६ ग्रामपंचयातीनी शॉर्ट टर्म मेजर म्हणून शेती विभागाचा बंधारा वापरावा व लॉंग टर्म साठी प्रस्ताव तयार करा असे सांगितले. नदी काठावरील ३० गावांनी बंधारा बांधून पाणी लिफट करावे. मुरगुडला जो प्रयोग केला तसा करावा व ३४ गावांचे शॉर्ट टर्म व १७४ गावांचा प्रस्ताव द्या असे सांगितले. तसेच नागरी घनकचरा बाबतची मिटींग घेवून शॉर्ट टर्म व लॉंग टर्म ठरवू असे सांगितले.